वि दि दावा क्र. ०९/२०१७
गगाधर वि. संभाजी



**वादी तर्फे सा.क्र.११**
**(नि.क्र.४६५)**

सत्य शपथेवर निवेदन करतो की,

**माझे नांव**- हरबीर हरिसिंग चौधरी, **वय** ५६ वर्षे, **धंदा** व्यापार, **राहणार** नाशीक.

**<u>सरतपास वादीतर्फे श्री.व्ही एस शेळके वकील यांच्यामार्फत सुरु.</u>**

१. सन २००० सालापासून मी फळांच्या व्यापारात आहे त्यापुर्वी आमच्या घरात माझा भाचा विष्णू राणा हा व्यापार करीत असे. आमच्या फर्म चे नांव राणा फ्रुट कंपनी आहे. ती नोंदणीकृत आहे. ती नोंदणी राणाच्या नांवे आहे. सन २००० साली भारतीय हवाई दलातून निवृत्त झाल्यावर मी या व्यवसायात आलो. माझ्या फर्मचे नांव महाराष्ट्र अॅग्रो सर्वीस नाशीक असे आहे. डाळींब, द्राक्षे आणि अन्य फळे यात आमचा व्यवसाय आहे. संपूर्ण महाराष्ट्र आणि गुजरात मधून आमच्याकडे फळे येतात. आमचा व्यवसाय कमिशन एजंट म्हणून आहे. शेतक-याच्या शेतात व्यापा-यास पाठवून रोज विक्री होणा-या मालावर आम्ही कमिशन घेतो. मी शेतक-याच्या शेतात जावून पहाणी करुन त्याचा माल आमच्या करवी दिल्ली मार्केटला विकतो, येणारे पैसे आमचे कमिशन कापून शेतक-याच्या खात्यावर जमा करतो.

२. मी राणा फ्रुटसाठी काम करतो त्याबददल त्यांनी मला पत्र दिले आहे, जे मी याकामी दाखल केले आहे. आता मला सदर पत्र दाखविले ते कंपनीच्या लेटरपॅडवर आहे, त्यावर विष्णू राणा याची सही आहे, ती मी ओळखतो. नेहमीच्या पहाण्यातील ती सही असल्याने मी ओळखतो. त्यातील हस्ताक्षर राणाचे आहे. तसेच त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे त्यास **निशाणी ४६८** देण्यात येते.

३. नाशीक येथील बापू जाधव हे डाळीब उत्पादक शेतकरी असून ते शेतीविषयक सल्लाही देतात. गंगाधर देपे यांच्या शेतात जाण्याचा मला २००२ साली योग आला आहे. ती डाळींब शेती होती. त्यांच्याकडील बराचसा माल मी पुष्कळ वर्षांसाठी दिल्लीला पाठवित होतो. सेंद्रीय डाळींब म्हणून त्यांचे डाळीब पिक मशहूर होते. धनाकर्षाद्वारे राणा फ्रुटस गंगाधर यांना पैसे देत. स्टेट बँक ऑफ पटीयाला यांचेकडील अनुक्रमे २०००००, १००००० रक्कमांचे धनाकर्ष वादीला दिलेले आहेत. सदरचे धनाकर्ष २००२ सालातील आहेत. पहिले दोन ते तीन वर्षे २० ते २५ लाखाचे डाळींब व त्यानंतर ३० ते ४० लाखाचे डाळींब दरवर्षी मी त्यांच्याकडून घेत होतो. डाळींबाच्या ट्रक सोबत दिल्लीला राम किंवा हडबे हे वादींचे प्रतिनिधी जात होते. सोबतच्या व्यक्तीला थोडीफार रोख रक्कम आम्ही देत असू. कधी कधी डी डी शिवाय रोख रक्कमही आम्ही गंगाधर यांना देत असू. जवळजवळ ७० एकर डाळींब बाग वादींची आहे असे मला त्यांचे मॅनेजर व हाडबे सांगत. वादीच्या बागेशिवाय डाळींबाची अन्य बाग मला त्या भागात दिसली नाही. कोर्ट समन्सद्वारे मी साक्षीला आलो आहे.

सरतपास पुर्ण

**<u>उलटतपास वादीतर्फे अॅड डी ए पौळ यांचेमार्फत सुरु.</u>**

४.	निशाणी ४६८ हे पत्र मला कधी दिले त्याची तारीख त्यावर नमुद नाही हे खरे आहे. डी डी वर २००५ साल नमुद आहे किंवा कसे हे मला नक्की सांगता येत नाही. देपे यांचे गाव कोपरे आहे. मला त्यांच्या शेताचा सर्वे क्रमांक व गट क्रमांक सागता येत नाही. अंबाजोगाईहून येताना पहिल्यांदा वादीचे शेत लागते त्यांनतर गाव लागते. अंबाजोगाई रस्त्याच्या दोन्ही बाजूला वादीचे शेत आहे. वादींना किती भाउ व किती बहिणी आहेत हे मला माहिती नाही. कोणाच्या नांवे किती क्षेत्र आहे हे मला माहिती नाही. महाराष्ट्र अॅग्रो सर्विस या फर्मची नोंदणी आहे. वादीला दिलेल्या डी डीं ची नोंद मी सोबत आणलेली नाही. त्याची तारीख, वार, वर्षे मला सांगता येत नाही. डी डी वगळून दिलेल्या रोख रक्कमेच्या पावत्या माझ्याकडे आज नाहीत. त्यावेळेला केल्या होत्या, त्या मी आत्ता उपलब्ध झाल्यास दाखल करेल. खरेदी मालाचे मोजमाप आत्ता माझ्याकडे उपलब्ध नाही. डी डी वरील सही बॅंक मॅनेजरची आहे. सदरचा डी डी मी स्वता दिलेला नाही. गंगाधरच्या जमीनीखेरीज मी अन्य कोणाच्याही जमीनीत या भागात गेलो नाही. हिंगणगाव, किनगांव या भागातही डाळींब बागा आहेत याची मला माहिती नाही. २००३ साली वादीची डाळींब बाग लावण्यात आली याची मला माहिती नाही. हे खरे की वैयक्तीकपणे मला वादीची बाग किती क्षेत्राची आहे हे माहिती नव्हते. हे खरे की, वादी प्रतिवादींच्या आर्थिक व्यवहाराबाबत मला माहिती नाही. मी १५ एप्रिल रोजी कारने नाशीकहून इकडे आलो होतो. आज मी बस ने आलो आहे. हे खरे नाही की, त्याचा खर्च वादीने मला दिला आहे. हे खरे नाही की, मी आजरोजी वादीच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास पूर्ण.</u>**

**श्रवणोत्तर स्विकृत**

समक्ष

**स्वाक्षरीत/**

**(एस.एन.सरडे)**

दिनांक २४/०४/२०२६.	दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपूर.